दैनिक युवाराष्ट्र दर्शन

# यवतमाळ जिल्हा

३

शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६

## आग लागून होणाऱ्या ट्रॅव्हल्स अपघाताच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ**

जिल्ह्यात आग लागून ट्रॅव्हल्स अपघात होणे यामध्ये जीवितहानी झाल्याच्या घटनांची नोंद यापूर्वी झालेली असून आग लागून अपघात होणे यामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पुढील कालावधीत अशा घटनांची नोंद होऊ नये याकरिता जिल्हा प्रशासनाच्या वतीने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. याबाबतचे पत्रक जिल्हाधिकारी विकास मीना यांनी ट्रॅव्हल्स एजन्सी संचालकांना पत्रक जारी केले आहे. या मार्गदर्शक सुचनानुसार, प्रत्येक ट्रॅव्हल्स मालक यांनी दर पंधरा दिवसांनी आपल्या वाहनाची वेळोवेळी तांत्रिक व्यक्ती यांच्याकडून तपासणी करण्यात यावी, वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन जाऊ नये,लांब पल्ल्याच्या प्रवासाला रात्री पाळी द्रुतगती रोडवर गाडी चालवताना दोन चालक ठेवावीत जेणेकरून त्यांच्याकडून आळीपाळीने गाडी चालवता येईल, ट्रॅव्हल्स मालक यांनी आपल्या संस्थेतील सर्व चालक, वाहक, सफाई कामगार यांची महिन्यातून एकदा आरोग्य तपासणी करणे बंधनकारक राहील. सर्व ट्रॅव्हल्स मालक यांनी परिवहन विभाग यांनी आखून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. ट्रॅव्हल्सचा अपघात झाल्यास प्रवासी यांना तात्काळ बाहेर निघता येईल यासाठी संकटकालीन खिडकी दर्शक फलक लावण्यात यावे.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-

गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-

संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०

* एजन्सीसाठी संपर्क

ई-मेल ssawarkar43@gmail.com

### संक्षिप्त

#### अवैध रेतीचा ट्रॅक्टर पकडला

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ**

मुकुटबन पोलिस ठाण्याच्या हद्दीत दरा येथे रेती चोरीचा प्रकार १२ फेब्रुवारीला उघडकीस आला. सुशम पुरूषोत्तम मिलमिले (३०) रा. बाळापूर ता. झरी आणि चंद्रकांत मारूती आगलावे (२९) रा. बाळापूर ता.वणी हे दोघे रेती चोरून नेताना आढळले. पोलिसांनी रेती व ट्रॅक्टर असा ३ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त करत गुन्हे दाखल केले. या प्रकरणी मनोज नारायणराव चवरे (४७) यांच्या फिर्यादीवरून मुकुटबन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

#### तार लंपास

यवतमाळ : शेतशिवारात चोरट्यांची वक्रदृष्टी फिरली आहे. त्यातच ९ फेब्रुवारी रोजी चोरट्यांनी तब्बल ५२ हजार ३०८ रूपयांची तार चोरून नेली. हा प्रकार दारव्हा तालुक्यातील तरनोळी फुबगाव नखेगाव खरबी शिवारात उघडकीस आला. या प्रकरणी गणेश शंकरराव खोपे (४९) रा. तळेगाव यांनी दारव्हा पोलिसात तक्रार दिली असून अज्ञात चोरट्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# पोहरादेवी येथे आज संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव

## राज्यातील समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे : ना. संजय राठोड यांचे आवाहन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १३ फेब्रुवारी**

बंजारा काशी तीर्थक्षेत्र पोहरादेवी ( जि. वाशीम) संत नगरीत श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव उद्या १४ फेब्रुवारी रोजी शनिवारी पर्यटन विभाग, महाराष्ट्र राज्य, बनजारा विरासत संघाच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजित पवार हे उपस्थित राहणार आहेत. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील गोर बंजारा समाजबांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते ना. संजय राठोड यांनी केले आहे.

जय सेवालाल बोलो, पोहरागड चालो, असा नारा ना. संजय राठोड यांनी दिला आहे. यावेळी बंजारा काशी तीर्थक्षेत्र पोहरादेवीत श्री संत सेवालाल महाराज जयंती महोत्सव उदघाटन व सेवा रत्न पुरस्कार सोहळा मान्यवरांच्या हस्ते लाखो सेवा भक्तांच्या साक्षीने पार पडणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजित पवार, मृद् व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे



पालकमंत्री संजय राठोड, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे उपस्थित राहणार आहेत. शुभआशीर्वाद देण्यासाठी धर्मगुरु महंत तथा आमदार श्री. बाबुसिंग महाराज, धर्मगुरू महंत श्री. कबीरदास महाराज यांची उपस्थिती राहील. त्याच बरोबर यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख, विधान परिषद सदस्य श्रीमती भावनाताई गवळी, विधान परिषद सदस्य राजेश राठोड, विधानसभा सदस्य तुषार राठोड, विधानसभा सदस्य श्रीमती सईताई प्रकाश डहाके, पदवीधर मतदारसंघाचे विधान परिषद सदस्य धीरज लिंगाडे, शिक्षक मतदार संघाचे विधान परिषद सदस्य किरण सरनाईक, माजी खासदार हरिभाऊ राठोड, माजी आमदार निलय नाईक , वाशीम जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, वाशीम जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, वाशीम मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थितीमध्ये महंत जितेंद्र महाराज, महंत सुनील महाराज, महंत यशवंत महाराज, महंत शेखर महाराज, महंत गोपाल महाराज आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दुपारी १ वाजता पोहरादेवीच्या संतनगरीत आगमन होणार असुन आदिमाया शक्ती देवी जगदंबा, जगतगुरु संत सेवालाल महाराज आणि महान तपस्वी संत डॉ. रामराव बापू यांच्या समाधीस्थळी दर्शन घेऊन श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव साजरा करण्यासाठी मान्यवरासह हजेरी लावणार आहेत.

**उद्या शनिवारी दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १ वाजतापर्यंत संत सेवालाल महाराज प्रांगणात सेवा प्रसाद वाटप, दुपारी ४.३० ते ६ अल्पोपहार, रात्री ९ वाजता सेवा प्रसाद वाटप तसेच भजन कीर्तन कार्यक्रम, यावेळी सकाळच्या सुमारास "जातेन हातेम लेन चालो सेवालाल तू " या बंजारा गीतासह विविध गीते गायन करून घराघरात पोहचलेल्या गायिका मंगली यांचा गाण्यांचा बहारदार कार्यक्रम पार पडणार आहे. सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजता "टकटक देखरो सावरिया" बंजारा गीतासह गुलाबी साडी गाणी गाणारा तरुण गायक संजू राठोड यांच्या गाण्याचा बहारदार कार्यक्रमासह लेझर शो, ड्रॉइंग शो आणि फायर शो साजरा होणार आहे. या सोहळ्याला राज्यभरातील गोर बंजारा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक पर्यटन विभाग, महाराष्ट्र राज्य, बनजारा विरासत संघ व निमंत्रक राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्हयाचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले आहे.**

# शाळेचे साहित्य विकणारा तो मुख्याध्यापक निलंबित

## ईजनी येथील शाळेतील जुने साहित्य विना परवानगी विकणे भोवले

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, महागाव, दि. १३ फेब्रुवारी**

शाळेतील जुने साहित्य कोणतीही परवानगी न घेता परस्पर विकल्या प्रकरणी दोषी आढळलेल्या मुख्याध्यापकाला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निलंबित केले आहे.

महागाव तालुक्यातील ईजनी येथील जिल्हा परिषद शाळेत ग्राम पंचायत व शाळेचे जुने मोटार पंप,लोखंडी टेबल,पथदिव्यांचे लोखंडी पोल,एंगल यंदा विविध साहित्य ठेवुन होते . नुकताच येथील शाळेचा मुख्याध्यापकांचा प्रभार राजकीय दबावातून सहाय्यक शिक्षक प्रमोद वानखेडे मिळविला होता. राजकीय वरदहस्त असल्याचा कांगावा करीत हम करे सो कायदा याप्रमाणे प्रभारी मुख्याध्यापकांनी आपली मनमानी करीत कोणतीही शासकीय परवानगी न घेता हे सर्व साहित्य परस्पर विकले परंतु त्यामधून आलेली रक्कम त्यांनी शाळेच्या बँक खात्यात जमा न करता स्वतःच वापरल्याने गावकऱ्यांनी त्यांना याबाबत विचारपूस केली असता त्यांनी गावकऱ्यांना उद्धट व उर्मट भाषेत उत्तर देत तुम्हाला काय करायचे ते करा अशी धमकी दिल्याने. गावकऱ्यांनी याबाबतची तक्रार गटविकास अधिकारी महागाव,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करून संबंधित मुख्याध्यापकावर निलंबनाची कारवाई करून फौजदारी दाखल करण्यात यावी अशी मागणी केली त्याची दखल घेत चौकशी समिती नेमण्यात येवुन समितीच्या चौकशी अहवालात मुख्याध्यापक वानखेडे दोषी आढळल्याने अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या निलंबनाचे आदेश काढून वानखेडे यांना निलंबित केले आहे.त्यामुळे त्यांच्यावर प्रशासन फौजदारी कारवाई करणार का याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### साथीदारांवर कारवाई कधी होणार?

**मुख्याध्यापक वानखेडे यांनी गावातील व्यक्तींच्या मदतीने शाळेतील लाखो रुपयांचे जुने साहित्य अंबोडा येथील भंगार व्यावसायिकाला विकले असल्याचे उघड झाले असतांना याप्रकरणी केवळ मुख्याध्यापकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.परंतु ज्या व्यक्तींनी शासकीय साहित्य विकण्यास मदत केली तसेच शासकीय साहित्य खरेदी करणाऱ्या भंगार व्यावसायिक यांच्यावर अद्याप कारवाई झाली नसल्याने शासकीय मालमत्तेची परस्पर विल्हेवाट लावणाऱ्यांना प्रशासन पाठीशी घालीत असल्याचा आरोप गावकरी करीत असुन मुख्याध्यापकाला साहित्य विक्री करण्यासाठी मदत करणाऱ्या व्यक्तींवर व ते साहित्य विकत घेणाऱ्या व्यावसायिकावर कारवाई करण्याची मागणी केल्या जात आहे.**

# जळू द्वारा व्हेरिकोज व्हेन्सवर यशस्वी चिकित्सा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. १३ फेब्रुवारी**

सामका आयुर्वेद योग व वेलनेस सेंटर, गोधनी, यवतमाळ येथे रुग्णांना मिळाले नवे जीवन सामका आयुर्वेद योग व वेलनेस सेंटर, गोधनी, यवतमाळ येथे जळू (जलौका) उपचार पद्धतीद्वारे व्हेरिकोज व्हेन्स या जटिल आजारावर यशस्वी व संपूर्ण चिकित्सा करण्यात आली असून अनेक रुग्णांना वेदनामुक्त व आरोग्यदायी जीवन प्राप्त झाले आहे. व्हेरिकोज व्हेन्स हा पायांतील शिरांमध्ये रक्त साचून सूज, वेदना, जळजळ, खाज, काळसर रंग बदल, त्वचेवर जखमा व चालताना त्रास निर्माण करणारा गंभीर विकार आहे. आयुर्वेदानुसार हा विकार रक्तदुष्टी व वात-पित्त



दोषांच्या असंतुलनामुळे होतो. जलौका अवचारण (जळू उपचार) ही आयुर्वेदातील अत्यंत सुरक्षित व प्रभावी रक्तमोक्षण पद्धत आहे. जळू शुद्ध दूषित रक्त शोषून घेतात आणि त्यातून हिरुडीन, कॅलिन, हिस्टामीन यांसारखे जैव-सक्रिय घटक स्त्रवित होतात, जे— रक्त पातळ करतात, सूज कमी करतात, रक्ताभिसरण सुधारतात, वेदना व दाह कमी करतात, जखम भरून येण्यास मदत करतात या शास्त्रशुद्ध पद्धतीने उपचार केल्यामुळे रुग्णांच्या पायातील सूज, वेदना, जळजळ, निळसर शिरा व चालताना होणारा त्रास लक्षणीय प्रमाणात कमी झाला असून काही रुग्ण पूर्णतः बरे झाले आहेत. ही संपूर्ण चिकित्सा सामका आयुर्वेदचे तज्ञ वैद्य पंकज पवार व त्यांच्या कुशल टीमने अत्यंत काळजीपूर्वक, वैज्ञानिक दृष्टिकोनातून व रुग्णकेंद्रित पद्धतीने यशस्वीरीत्या केली आहे.

उपचारासोबतच रुग्णांना आहार, विहार, योगासन व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन देण्यात आले. विशेष जळू चिकित्सा शिबिराचे आयोजन दिनांक 15 फेब्रुवारी ते 25 फेब्रुवारी 2026 या कालावधीत सामका आयुर्वेद योग व वेलनेस सेंटर, गोधनी, यवतमाळ येथे जळू द्वारा व्हेरिकोज व्हेन्स निवारण विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात तज्ञ वैद्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षित, नैसर्गिक व शास्त्रशुद्ध उपचार करण्यात येणार आहेत. व्हेरिकोज व्हेन्सने त्रस्त रुग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवी सामका महिला बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष वैद्य पंकज पवार यांनी केले आहे.

# हरवलेली ४० हजारांची पिशवी प्रामाणिकपणे परत

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. १३ फेब्रुवारी**

लोकमतचे शहर प्रतिनिधी हरिओमसिंह बघेल यांच्या प्रामानिकपनाचे कौतुक होत आहे . वर्दळीमुळे गजबजलेल्या तहसील कार्यालय परिसरात प्रामाणिकपणाचे दर्शन घडविणारी घटना आज घडली आहे. वरुड भक्त येथील रहिवासी तथा माजी सरपंच सुरेश पांडुरंग काळे यांची तब्बल ४० हजार रुपये रोख रक्कम असलेली पिशवी तहसील कार्यालय परिसरात आज हरवली होती.

ही पिशवी लोकमतचे शहर प्रतिनिधी हरिओमसिंह बघेल यांच्या निदर्शनास येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता आपली सामाजिक जबाबदारी ओळखून सदर पिशवी तात्काळ तहसील



प्रशासनाकडे सुपूर्द केली. पिशवी कोणाची आहे यांची तहसिल दाराने खातर जमा करुन सुरेश काळे यांच्या ताब्यात दीली. यावेळी तालुका दंडाधिकारी वैशाख वाहूरवाघ, नायब तहसीलदार उदय तुंडलवार, नायब तहसीलदार एस. एस. अदमुलवार यांच्यासह आर्णीतील पत्रकार प्रमोद कुदळे,राजेश माहेश्वरी रशिद मलनस, मनोज माघाडे उपस्थित होते. मोठी रक्कम प्रामाणिकपणे परत मिळाल्याने सुरेश काळे यांनी लोकमतचे प्रतिनिधी हरिओमसिंह बघेल व तहसील प्रशासनाचे आभार मानले. या घटनेमुळे आजच्या काळातही प्रामाणिकपणा, सामाजिक भान आणि पत्रकारितेची मूल्ये जिवंत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. लोकमतचे शहर प्रतिनिधी हरिओमसिंह बघेल यांच्या प्रामानिक वागण्यामुळे नागरिकांमध्ये त्यांचे कौतुक होत आहे.

# स्वर्णलीला स्कूलमध्ये 'उडान' वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. १३ फेब्रुवारी**

वणी येथील नामांकित अल्फोर्स स्वर्णलीला इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'उडान' या शीर्षकाखाली भव्य वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या शैक्षणिक प्रगतीचा गौरव करण्यासोबतच त्यांच्या अंगी दडलेल्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

विशेष म्हणजे संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनीच केले. कार्यक्रमासाठी पंचायत समिती वणीचे गटविकास अधिकारी किशोर गज्जलवार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे तसेच उपविभागीय अधिकारी नितीनकुमार हिंगोले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. अल्फोर्स ग्रुप ऑफ स्कूल्स अँड कॉलेजेसचे अध्यक्ष डॉ. व्ही. नरेंद्र रेड्डी, प्राचार्या अन्नपूर्णा पवन व उपप्राचार्य विक्की मोहानी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

# हवामान अभ्यासक पंजाब डख यांची कलगाव येथे उपस्थिती

**•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी दिग्रस, १३ फेब्रुवारी**

तालुक्यातील दिग्रस ते आर्णी रोडवरील वाई मेंढी फाट्या जवळ प्रगतिशील शेतकरी देवानंद पंडागळे या शेतकऱ्याच्या शेतात हरभरा पीक पाहणी कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाब डख उपस्थित होते. किशोर जाजु आणि तालुक्यातील कृषी विक्रेते आणि शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांना संबोधित करतांना त्यांनी इनोवेज 81 या हरभरा पिकाविषयी माहिती सांगितली. हा हरभरा एक्यांशी दिवसात तयार होतो. चाळीस ते अठ्ठेचाळीस दिवसात फुलांच्या अवस्थेत येतो. हे पीक हार्वेस्टिंग ने (यंत्राद्वारे )काढता येते



त्यामुळे मजुरी खर्चात बचत होते. त्यानंतर त्यांनी हवामान विषयक उपस्थिताना माहिती सांगितली. यावर्षी पाऊस सरासरी असून पीक चांगले राहतील त्यानंतर त्यांनी असे सांगितले की पावसाचा अंदाज कोणाला न विचारता निसर्गच अंदाज देतो ते ओळखा आणि शेती करा. निंबाच्या झाडाचा शेंडा वाळला तर पाऊस कमी प्रमाणात पडतो. असे बरेच उदाहरणे त्यांनी दिली.वीस फेब्रुवारीपासुन ऊन वाढणार असुन आठवड्याच्या शेवट ढगाळ वातावरण निर्माण होणार आहे, असे प्रतिपादन केले. उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि मोलाचा सल्ला दिला प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाब डख हे येणार असल्याने परिसरातील शेतकरी खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाला अमोल बनगिनवार, विष्णु भनक, परिक्षीत पंडागळेसह आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वीज ग्राहकांच्या जागृतीसाठी महावितरणची 'जनजागृती रॅली'

## स्मार्ट मीटर आणि सौर ऊर्जेचा वापर करण्याचे महावितरणचे आवाहन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. १३ फेब्रुवारी**

वीज ग्राहकांमध्ये शासनाच्या विविध योजनांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वीज देयकांच्या नियमित भरण्याबाबत प्रोत्साहन देण्यासाठी, महावितरणच्या वतीने आज, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी ढाणकी शहरात भव्य 'जनजागृती रॅली'चे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान आणि वीज बचतीचा संदेश घरोघरी पोहोचवण्यात आला. महावितरण उपकार्यकारी अभियंता जाधव, ढाणकी सहाय्यक अभियंता राहुल नाकले, साखरा सहयक अभियंता पवन गिरी, माजी सहाय्यक अभियंता अनिल वानखेडे , संजय पडोळे , गजानन राजटकर, चंद्रभान बाभळे , सय्यद रफिक , रवींद्र दवणे, सुनील कांबळे, कृष्णा गायकवाड, कृष्णा कत्तुलवाड, आठवले, सय्यद सलीम, काळबांडे, सुरोशे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही रॅली काढण्यात आली व इतर कर्मचारी उपस्थित होते शहराच्या मुख्य भागातून निघालेल्या या मोटरसायकल रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. महावितरणच्या सर्व स्तरांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

या रॅलीदरम्यान महावितरणच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना नियमित वीज बिल भरणा: अखंडित वीज पुरवठ्यासाठी वीज बिलाचा वेळेवर भरणा करणे कसे आवश्यक आहे, याबाबत आवाहन करण्यात आले. भविष्यात येणाऱ्या स्मार्ट मीटर प्रणालीमुळे ग्राहकांना होणारे फायदे आणि पारदर्शकता यावर प्रकाश टाकण्यात आला, बिलातून कायमस्वरूपी सुटका मिळवण्यासाठी शासनाच्या 'सोलर रूफ टॉप' योजनेची माहिती देऊन जास्तीत जास्त नागरिकांनी सौर ऊर्जेचा वापर करावा, असे सांगण्यात आले., वीज वापरताना घ्यायची सुरक्षितता आणि विजेचा अपव्यय टाळून राष्ट्रीय बचत कशी करता येईल, याचे मार्गदर्शन करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गावरून फिरताना "वीज वाचवा - देश वाचवा", "नियमित बिल भरा - सहकार्य करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. महावितरणच्या या उपक्रमाचे ढाणकी शहरातील नागरिकांनी स्वागत केले असून, अशा उपक्रमांमुळे ग्राहक आणि



महावितरण यांच्यातील संवाद वाढण्यास मदत होईल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

### नावात बदल

लग्नापूर्वी माझे नाव पिंकी किरीट वोरा हे होते. लग्नानंतर माझे नाव जसिका संदीप देसाई आधार क्रमांक 298394920638 असे आहेत. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

### CHANGE OF NAME

OLD NAME AS PER PASSPORT NO: N8377680

**POOJA KAMAL JAYASWAL**

NEW NAME

AS PER ADHAR CARD & PAN CARD

**POOJA KAMAL JAISWAL**

ADDRESS: Flat no S1 Sweet Home Residency Plot No 13 14, Behind Vedhana Dharni School Pimpal gaon Yavatmal 445001

युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया
जिल्हा
शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६
**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा
मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

## कान्होलीतील महिलांचा मद्यविक्री केंद्राला तीव्र विरोध

**जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; परवाना रद्द न झाल्यास आंदोलनाचा इशारा**



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोरगाव :** ग्रामपंचायत कान्होली अंतर्गत धाबे टेकडी परिसरात नव्याने मंजूर करण्यात आलेल्या बिअर बार / मद्यविक्री परवान्याविरोधात कानोली व परिसरातील महिलांनी एकमुखी आवाज उठवित आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. सदर परवाना तात्काळ रद्द करून दुकान सुरू होण्यापासून थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

महिलांच्या निवेदनानुसार, धाबे टेकडी, जब्बारखेडा व सोनार कान्होली परिसरात मद्यविक्री केंद्रास मंजुरी देण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. संबंधित दुकान अद्याप सुरू झाले नसले तरी लवकरच सुरू करण्याची तयारी सुरू असल्याचे समजताच महिलांनी संघटित पवित्रा घेत प्रशासनाकडे धाव घेतली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामीण भागात मद्यविक्रीमुळे घरगुती अत्याचार, कुटुंबातील वाद, आर्थिक उत्पन्नाची नासाडी, मुलांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढण्याची भीती आहे. शासनाच्या दारूबंदी व व्यसनमुक्ती धोरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामसभेचा ठराव व महिलांचा विरोध विचारात घेणे आवश्यक असल्याचे महिलांनी स्पष्ट केले. या संदर्भात ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद असून त्याची प्रत प्रशासनास सादर करण्यात आली आहे. संबंधित परवाना रद्द न केल्यास महिलांकडून लोकशाही मार्गाने आंदोलन, मोर्चा व उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने सदर विषयाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी कान्होली व परिसरातील महिला ग्रामस्थांनी केली आहे. निवेदन देतेवेळी सरपंच छाया आमले, हेमलता गावड, विरेखा वलके, रुक्मिणी मडावी, सुषमा वलके, जासुका मडावी, आनंदा मडावी, गंगोत्री इन्कने आदी महिला उपस्थित होत्या.

## स्टेट लेवल टेक्निकल पेपर प्रेजेंटेशन कॉम्पिटिशनचे आयोजन




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**देवरी :** स्थानिक देवरी येथील छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसी व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने स्टेट लेवल टेक्निकल पेपर प्रेजेंटेशन कॉम्पिटिशनचे भव्य व यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत नागपूर विभागातील डिप्लोमा इन फार्मसीच्या एकूण ३३ महाविद्यालयांनी सहभाग घेतला.

यावेळी डॉ. कांचन मानकर, वैशाली राजे, अनिलकुमार येरणे, जयश्री येरणे उपस्थित होते. या स्पर्धेचे परीक्षण डॉ.निखिल अमनेरकर, डॉ.मंगेश कुमारे, डॉ. योगेश आमगावंकर आणि गौरव परभत यांनी केले. कार्यक्रमाला डॉ.महेंद्र शिराडकर , डॉ. उपदेश लाडे आणि योगेश तिरगाम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध नाविन्यपूर्ण व संशोधनात्मक विषयांवर आपले टेक्निकल पेपर प्रेजेंटेशन करून परीक्षक व उपस्थितांची प्रशंसा मिळवली. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक १५,००० रोख कु. संभावी मिश्रा व कु. दिपाली वंजारी, द रॉयल गोंडवाना कॉलेज ऑफ फार्मसी, नागपूर यांनी मिळवले. तसेच द्वितीय पारितोषिक १०,००० रोख विवेक खोंड व कु. शब्बो अन्सारी, व्ही.वाय.डब्ल्यू.एस. इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इन फार्मसी, बोरगाव, वर्धा यांनी मिळवले तसेच तृतीय पारितोषिक ५,००० रोख कु. रुची भट व मितेश गौतम, महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, खमारी यांनी मिळवून यश संपादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दीक्षा लांजेवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कु. किरण कापगते यांनी मानले. एकंदरीत या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांनी गावकऱ्यांना उत्तमसेवा पुरवावी

**आढावा बैठकीत ग्रा.प.अधिकारी पराग बाळने यांचे निर्देश**

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** गावकरी हे ग्रामपंचायत प्रशासनाचे खरे मालक आहेत. तसेच ग्राम पंचायत प्रशासनाचा कारभार हा पारदर्शक असावा त्यामुळे गावकऱ्यांनी मागितलेली माहिती त्यांना वेळेत पुरविणे आपले कर्तव्य आहे. आपले कर्तव्य बजावत असताना ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांनी गावकऱ्यांचे आदर ठेवून त्यांना उत्तम सेवा पुरवावी असे प्रतिपादन गोंदिया तालुक्यातील गंगाझरी ग्राम पंचायत येथे नव्याने रुजू झालेले ग्रा.पं. अधिकारी पराग बाळने यांनी व्यक्त केले. ते शुक्रवारी (ता.१३)स्थानिक ग्राम पंचायत भवनात आयोजित पदभार समारंभात बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात द्विप प्रजेलनाने करण्यात आली. आपली ग्रामपंचायत ही आदिवासी बहुल आहे.त्यामुळे येथे जलदगतीने विकास कामे होणे गरजेचे आहे.ग्रामविकास हा गावकऱ्यांच्या सहभागातूनच शक्य आहे असे विचार प.स.सदस्या वंदना पटले यांनी यावेळी व्यक्त केले.कार्यक्रमाचे संचालन संदीप कावळे यांनी तर आभार विजय डोंगरे यांनी मानिले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमोद आगाशे, जित मरस्कोले, विशाल उके, भोजवंती घरडे, इंद्रावती लिल्हारे यांनी सहकार्य केले.



## क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून मारहाण

**गोंदिया :** केशोरी पोलिस ठाण्यांतर्गत राजोली येथे सरपणाच्या काळ्या का चोरल्या या कारणावरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून मारहाण केली. ही घटना ९ फेब्रुवारीची आहे. फिर्यादी शंकर मेश्राम हे ग्रामपंचाय समोर बसले असतांना आरोपी कन्हैयालाल गणवीर याने फिर्यादीला माझ्या सरपणाच्या काळ्या चोरल्या, या कारणावरून वाद निर्माण करीत, शिवीगाळ केली व मारहाण करून जखमी केले.

## शिवरात्री निमित्त इर्री पहाडीवर यात्रेचे आयोजन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** तालुक्यातील इर्री येथील पहाडीवरील शिव कालेश्वर मंदिरात शिवरात्री निम्मित रविवारी (ता १५)यात्रेचे आयोजन करण्यात आले असून शिव भक्तांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन समिती तर्फे करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी शिव-अभिषेककाने होणार आहे. त्यानंतर पूजा व हवन पूजनाचे कार्यक्रम होणार असून तद्नंतर दुपारपासून महाप्रसाद कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे. त्याचबरोबर येथे भव्य निःशुल्क हृदय रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . तसेच शिव भक्तांसाठी देवी जागरण व श्याम कीर्तन कार्यक्रमाचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. सदर स्थळ निसर्ग रम्य असून रहदारीसाठी योग्य आहे. परिसरातील शिव भक्तांनी या यात्रेचा लाभ घेण्याचे आवाहन महाकालेश्वर मंदिर ट्रस्ट समिती तसेच या क्षेत्राच्या जिल्हा परिषद सदस्या लक्ष्मी तरोने केले आहे.




## गळफास घेवून आत्महत्या

**गोंदिया :** डुग्गीपार पोलिस ठाण्यांतर्गत खोबा येथे गळफास घेवून इसमाने आत्महत्या केली. ही घटना १२ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. अभीजित रायभान उके (३३) रा. खोबा असे मृताचे नाव आहे. दारुच्या व्यसनी असलेला अभीजितने स्वत: खोलीत गळफास घेवून आत्महत्या केली. फिर्यादी रायभान उके यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## प्लास्टिक बंदी मोहिमेंतर्गत व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोरगाव :** शासनाने १ जुलै २०२२ पासून सिंगल युज प्लास्टिक वर देशव्यापी बंदी घातली.तरीही शहरात मोठ्या प्रमाणावर बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर जोमात सुरू असल्याने मुख्याधिकारी ज्ञानेश सोनवाने यांच्या मार्गदर्शनात नगरपंचायत ने प्लास्टिक बंदी विरोधात धडक मोहीम हाती घेतली.शहरातील फुटपाथ विक्रेत्यांपासून तर मोठ्या व्यापारपर्यंत सर्वाची चौकशी सुरू केली. दरस्यान अनेक व्यापाऱ्यांकडे बंदी असलेली प्लास्टिक आढळून आली. या व्यापाऱ्यांवर प्लास्टिक बंदी कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. दंडात्मक कारवाई मध्ये मागील दीड महिन्यात पाच हजार ९०० रुपयांची वसुली करण्यात आली.



नगरपंचायतच्या या धडक कारवाईमुळे अनेक व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले असून काही व्यापाऱ्यांनी प्लास्टिक मागू नका अशी जागृती करणारे फलक व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये लावले आहेत.व्यापाऱ्यांच्या या कृतीचे सर्वत्र स्वागत होत आहे.अभियानाच्या यशस्वीतेत स्वच्छता प्रमुख वृषभ पांडे, निखिल बंड,दिलीप उईके,एकनाथ चव्हाण, सुमित मेश्राम,शुभम गौरकर, अश्विनी शहारे, मनीषा मेश्राम,सुरेश बोरीकर,दुर्योधन नेवारे यांचा समावेश आहे. 'प्लास्टिक ही विघटन न होणारी पर्यावरणाला धोकादायक वस्तू आहे. प्लास्टिक मुळे पर्यावरणासोबत मनुष्याचे जीवनही धोक्यात आले आहे.प्लास्टिक वस्तू जाळल्यामुळे घातक विषारी वायू तयार होऊन तो श्वसनाद्वारे मानवी शरीरात प्रवेश करतो. यामुळे मोठे मोठे आजार होतात.प्लास्टिक वस्तूंना पर्याय म्हणून कागदी आणि कापडी पिशव्यांचा वापर करावा.सरकारच्या या प्लास्टिक बंदी अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन नगरपंचायत मुख्याधिकारी ज्ञानेश सोनवाणे यांनी केले आहे.'

कमी मायक्रोनच्या पिशव्या, प्लास्टिकचे चमचे, प्लेट्स,थर्माकोल आणि प्लास्टिकच्या काड्या यासारख्या वस्तूंची निर्मिती,साठवणूक,विक्री आणि वापरावर कठोर निर्बंध घातले.या नियमांचे उल्लंघन केल्यास पाच हजार ते विस हजार रुपये पर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली.

## वन कर्मचाऱ्यांना रेबीज लसीकरण



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तिरोडा :** रेबीज लस ही वन कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी एक अत्यावश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना असल्यामुळे जिल्हाधिकारी प्रजित नायर व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम यांच्या कल्पक विचारातुन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार यांनी जिल्ह्यातील वन कर्मचाऱ्यांना रेबीज लसीकरण मोहिमेचे नियोजन पुर्ण केले आहे. टप्प्याट्प्प्याने जिल्ह्यातील वन कर्मचाऱ्यांना रेबीज लसीकरण करण्यात येणार आहे. मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात ३ फेब्रुवारी रोजी तिरोडा तालुक्यातील २० वन अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रेबीज लसीकरण करण्यात आले.

रेबीज लसीकरण झालेल्या कार्यक्रमाचे उदघाटन नगरपरिषद तिरोडा येथील नगरसेविका ममता धामेचा व तिरोडा तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दर्शना नंदागवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.रेबीज लसीकरण सत्रामध्ये अशोक वॉर्ड येथील नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.नेहा पटले व आपला दवाखानाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.जांभुळकर यांनी लाभार्थीस रेबीज लसीकरण बद्दल माहिती दिली.रेबीज लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, तिरोडा टिएचओ डॉ.दर्शना नंदागवळी व तालुका आरोग्य सहाय्यक लिलाधर निपाणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## गटशिक्षणाधिकाऱ्यांनी स्विकारला पदभार



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोरगाव :** पंचायत समिती येथे गटशिक्षण अधिकारी म्हणून जनार्दन राऊत ११ फेब्रुवारी रोजी अधिकृतपणे पदभार स्वीकारला.पदभार स्वीकारताच त्यांनी तालुक्याच्या जिल्हा परिषद शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, शाळांमधील मूलभूत सुविधा मजबूत करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी,शिक्षक संघटनांचे पदाधिकारी तसेच शिक्षण विभागातील विविध घटक उपस्थित होते. उपस्थितांनी गटशिक्षण अधिकारी जनार्दन राऊत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.नवे गटशिक्षण अधिकारी म्हणून जनार्दन राऊत यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील शैक्षणिक कार्याला अधिक गती मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## तीन दिवसीय छायाचित्र प्रदर्शनीस रासेयो स्वंवसेवकाची भेट

**जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे यांनी साधला संवाद**

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** अनुसूचित जातीतील घटकांसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्यक्ष पात्र नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी नवीन प्रशासकीय इमारतीत सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची तीन दिवसीय छायाचित्र प्रदर्शनीस जिल्ह्यातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वंयसेवक यांनी भेटी देवून माहीती जाणून घेतले.



या कार्यक्रमाला सहाय्यक आयुक्त (सामाजिक न्याय) किशोर भोयर, तहसीलदार समशेर पठाण, अपर तहसीलदार श्रीकांत कांबळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, सहाय्यक शल्य चिकित्सक अधिकारी डॉ. तृप्ती कटरे, जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे निमसरकर, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा सम्नवयक प्रो. डॉ. बबन मेश्राम उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे-निमसरकार व एन. एम. डी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बबन मेश्राम यांनी विद्यार्थीशी संवाद साधतांना छायाचित्र प्रदर्शनी मध्ये एकूण ४६ योजना लावण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शासकीय निवासी शाळा, भारत सरकारची मॅट्रिक उत्तर शिष्यवृत्ती, सैनिकी शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, राजश्री छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार, मिनी ट्रॅक्टर योजना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वधार योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, कन्यादान योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना अशा विविध योजनांचे प्रदर्शनी दालन असल्याचे सांगून सविस्तर माहिती देवून विद्यार्थी चे समाधान केले.सदर प्रदर्शन नागरिकांनी अनुसूचित जातीतील घटकांसाठीच्या प्रदर्शनीचा लाभ उचलावा असे, आवाहन सहायक आयुक्त किशोर भोयर आणि जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे निमसरकर यांनी केले आहे.

### पथनाट्यातून लोकजागृती

विक्रम फडके यांच्या असर फाउंडेशनच्यावतीने लोककलाकारांनी पथनाट्य सादर करून अनुसूचित जातीतील घटकांसाठीच्या विविध योजनांची माहिती दिली. मनोरंजनातून दिलेल्या या संदेशामुळे उपस्थित नागरिकांना योजनांची माहिती प्रभावीपणे समजली. तसेच येथे ३६० अंश फिरणारा सेल्फी स्टँडही ठेवण्यात आल्या आहे. कार्यक्रमाची प्रस्तावना जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे निमसरकर यांनी केली, तर सूत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले.

**जाहीरनामा**

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सडक/ अर्जुनी**
**एम.जे.सी. वारसान केस नं. २/२०२६**
**प्रो.क्र. ४३/२६**
**पेशी ता. ०६/०३/२०२६**

**अर्जदार :-** १) कांता वामन खुटमोडे, वय ५६, वर्षे, धंदा - गृहिणी, २) विशाल वामन खुटमोडे, वय २४ वर्षे, धंदा- शिक्षण, ३) शारदा तेजराम खुटमोडे, वय ७५ वर्षे, धंदा गृहिणी सर्व रा. वॉर्ड क्र. २ डव्वा, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया
**गैरअर्जदार :- कुणी नाही**
उपरोक्त अर्जदारांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट (VIII) १८२७ चे कलम २ व ३ अंतर्गत वारसान प्रमाणपत्र मिळण्याबाबत विद्यमान कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. ह्या नोटीसाव्दारे सर्व संबंधीतांना, नातेवाईकांना, वारस, अथवा गोत्रांना कळविण्यात येते की, मृतक वामन तेजराम खुटमोडे यांचा दि.२२/१२/२०२५ ला गोंदिया केअर हॉस्पिटल गोंदिया येथे मृत्यू झालेला आहे. त्यांचे पश्चात अर्जदार क्र. १ ते ३ हे मय्यताचे वारसान आहेत. त्यांचे शिवाय दुसरा कुणीही वारसान नसल्याने यांना अनुकंपा तत्वावर शासकिय सेवेत घेण्याकरिता तसेच इतर शासकिय कामाकरिता अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस म्हणून यांचे नाव चढविण्याच्या संबंधाने अर्जदारांना वारसान प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. सर्व संबंधितांना या जाहिर नोटिसाव्दारे कळविण्यात येते की, कोणत्याही व्यक्ती. हितसंबंधीत वारस व हक्कदारास सदर प्रमाणपत्राबद्दल आक्षेप, उजर तक्रार असल्यास सदर जाहिर नोटीस प्रकाशित केल्याचे एक महिन्याच्या आत अथवा पेशी तारखेवर उजर तक्रार स्वतः अथवा वकिलामार्फत दाखल करावी. अशी ही कोणतीही उजर तक्रार दाखल न झाल्यास अर्जदारांना वारसान प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. तद्नंतर आलेले कोणतेही आक्षेप अथवा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच ती अर्जदारांना बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.
आज दि.११/०२/२०२६ रोजी सहीने व शिक्क्यानिशी दिले.
(शिक्का) सहायक अधिक्षक
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर सडक अर्जुनी**

**जाहीर सुचना**

श्री.प्रकाश चतुरदास भिमटे इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. ६/४०/९१५, वार्ड का नाम मंगरुजी फेंडार वार्ड, मालमत्ता क्र.६/४०/९१५ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.१२/०८/१९९९ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) प्रियंका निखील मेश्राम इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

**जाहीर सुचना**

श्रीमती हेमनबाई विठोबा बनकर इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र.७, वार्ड का नाम गोविंदपूर वार्ड, मालमत्ता क्र.७/२७२ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.२३/०९/२०२० को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) राजेंद्र विठोबा बनकर, २) शैलेन्द्र विठोबा बनकर इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

**जाहीर सुचना**

श्री. मार्तंडराव सितकुराजी उके इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. १६, वार्ड का नाम गौतमबुद्ध वार्ड, मालमत्ता क्र.३९ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.०३/०२/२०२२ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) श्री. सुरेश मार्तडराव उके, २) दिनेश मार्तडराव उके, ३) राजेश मार्तडराव उके, ४) श्री. नरेश मार्तडराव उके इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

**जाहीर सुचना**

श्री. रामचंद्र करमचंद केशवानी इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. २१/१३२, वार्ड का नाम शिवाजी वार्ड, मालमत्ता क्र.२१/१३२ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.१२/०८/२००३ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) राजकुमार २) अजयकुमार, ३) राजेश व. रामचंद्र केशवानी इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

**जाहीरनामा**

आम जनता को सूचित किया जाता है, कि मेरे पक्षकार १. श्रीमती मंजुषा पति विवेकराव करोले २. श्री विवेक वामनराव करोले इन्होने श्रीमती ज्योति विकास चौरसिया निवासी गोकुलधाम कॉलोनी हड्डीटोली रोड गोंदिया तह व जिला गोंदिया और इनकी मालकी हक्क कि कब्जे कि खाली प्लाट जमिन जो कि मौजा कुडवा त. सा. क्र. २६, थाक नं ८० सरहद गोंदिया नगर भूमापन गट नं १५९/१ नझुल शिट नं ४४ ए प्लाट नं १५९/१ एरिया ५५.७६ ची. मी सत्ता प्रकार क व कुल एरिया ६०० स्के. फिट याने ५५-७६ चौरस मिटर
**जिसकी चर्तुसिमा :-**
**पुरब में –गंगाप्रसाद साव का मकान**
**पशिचम में –लखनलाल चौरसिया का मकान**
**उत्तर में –१५ फिट चौडी नगर परिषद कि गल्ली**
**दक्षिण में – २० फिट का रोड**
उपरोक्त वर्णित खाली प्लाट जमिन का खरेदी करने का सौदा मेरे पक्षकार ने दि. २९/०१/२०२६ को श्रीमती ज्योति विकास चौरसिया से तय हुआ है, तथा विक्रेता ज्योति चौरसिया ने विक्री करने का करार कर बयाना राशी दि. २९/०१/२०२६ को प्राप्त किया है। व ३ माह के अंदर विक्रीपत्र रजिस्टर्ड करना तय हुआ था । इसलिये आम जनता को सुचित किया जाता है, कि इस उपरोक्त वर्णित खाली प्लाट जमिन पर संबंधित रिश्तेदार, आल औलाद वारसान या किसी भी आम जनता का कोई हक्क / अधिकार, कब्जा या कोई रोड रास्ते बाबत वाद हो, या और कोई भी किसी प्रकार का भी आक्षेप हो तो हमे सात दिन के भितर उपयुक्त दस्तावेज सहित अपना आक्षेप निम्नलिखित पत्ते पर दर्ज करवाये अन्यथा आक्षेप प्राप्त न होने पर पंजीकृत खरेदीखत मेरे पक्षकार के नाम से करवा लिया जावेगा यह सुचित किया जाता है, इसके उपरान्त कोई भी हक्क या दावा मान्य नहीं किया जायेगा ।
**एडॅ. निलु सुनिल मांढरे**
**सिव्हिल लाईन गोंदिया**
**मो. ८३२९४८३२५८**

## किटकनाशक प्राशन करुन इसमाचा आत्महत्येचा प्रयत्न

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

आर्वी,दि.१३

तालुक्यातील वाई येथील आशिष मसराम याने आज दि.१२ फेब्रुवारीला सकाळी १०.२५ वाजता किटकनाशक औषधी प्राशन करुन आर्वी पंचायत समिती कार्यालयात आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना घडली. सविस्तर वृत्त असे की, वाई येथील आशिष मसराम यांनी पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात येवून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबसाहेब आंबेडकर, व जननायक बिरसा मुंडा यांचे फोटो पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात ठेवून असलेले थायमेथॉक्साम १२.६ टक्के तसे लॅम्बडायसीनहॅमोथ्रीन ९.५ टक्के झेड ई हे घटक असलेले डबललीट सीनहूड या कंपनीचे किटकनाशक प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार वाई ग्रामपंचायतने निलंबित शिपाई कर्मचाऱ्याला कालच्या ग्रामपंचायत च्या सभेमध्ये ठराव घेऊन कामावर घेतले. निलंबित शिपायाला कामावर का घेतले याच रागातून त्याने हा प्रयत्न केला अशी चर्चा आहे. सदर व्यक्तिला उपजिल्हा रुग्णालय, आर्वी येथे त्याला उपचारा साठी नेण्यात आले तेथील डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचाराकरिता कस्तूरबा रूग्णालय, सेवाग्राम, येथे पाठविण्यात आले आहे.

# निम्न वर्धा प्रकल्पातील पाणी वापर संस्थांच्या सक्षमीकरणासाठी पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि.१३

निम्न वर्धा प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण व बळकटीकरण करण्यासाठी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर आणि गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू, यांच्यामध्ये सामंजस्य करार राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री. डॉ.पंकज भोयर, यांच्या उपस्थितीत करण्यात झाला.यावेळी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोखारे, विपाविम नागपूरचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता जयंत गवळी, जलसंपदा विभागचे मुख्य अभियंता सोनाली चोपडे, अधीक्षक अभियंता अनिल फरकडे, गोडवाणा विद्यापिठाचे देशकर, पुराणिक यावेळी



उपस्थित होते.

निम्न वर्धा प्रकल्प हा धनोडी गावाजवळ आर्वी तालुक्यात वर्धा नदीवर बांधण्यात आला असून विदर्भ विकास महामंडळ नागपूर यांच्या अखत्यारित आहे. मध्य विदर्भातील हा मोठा प्रकल्प असून सिंचन, औद्योगिक, पिण्यासाठी पाणी व मत्स्यव्यवसायासाठी महत्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाद्वारे सिंचन, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, औद्योगिक वापर तसेच मत्स्य व्यवसायासाठी पाणी उपलब्ध करून दिले जाते. प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता सुमारे ६३ हजार ३३३ हेक्टर इतकी आहे.राज्य शासनाच्या निर्णयानुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यक्षेत्रातील पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी नामांकित शैक्षणिक व व्यवस्थापन संस्थांचा सहभाग घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार गोंडवाना विद्यापीठाच्या माध्यमातून पुढील तीन वर्षांच्या कालावधीत प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, मार्गदर्शन केले जाणार आहे. यामुळे लाभधारकांमध्ये मालकीची भावना निर्माण होऊन सहभागित सिंचन व्यवस्थापन अधिक मजबूत होण्यास मदत होईल. या उपक्रमासाठी नियामक मंडळाच्या बैठकीत रुपये ३.८२ कोटींच्या खर्चास मान्यता देण्यात आली असून पाणी वापर संस्थांच्या माध्यमातून सिंचन व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्याचा शासनाचा मानस आहे. पाणी वापर संस्थांचा मुख्य उद्देश सदस्यांना समन्यायी पाणी वाटप सुनिश्चित करणे, सिंचन व्यवस्थेची कार्यक्षमता वाढवणे, पर्यावरणीय समतोल राखणे आणि शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग वाढवणे हा आहे. तसेच पाणी वाटप, आकारणी व वसुली, देखभाल-दुरुस्ती, पीक नियोजन, वाद निवारण आदी कामे संस्थांमार्फत प्रभावीपणे राबविणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र सिंचन पद्धती शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत प्रकल्प क्षेत्रात पाणी वापर संस्थांची स्थापना करण्यात आली आहे.

सध्या प्रकल्प क्षेत्रात लघु वितरिका स्तरावर १२६ संस्था, वितरिका स्तरावर १६ संस्था कार्यरत असून कालवा व प्रकल्प स्तरावरही संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.




## देशव्यापी संपाला शहरात प्रतिसाद; रेल्वे स्थानकावर कामगारांचा निर्धारयुक्त एल्गार

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि.१३

केंद्रीय ट्रेड युनियनच्या आवाहनावरून बुधवारी (१२ फेब्रुवारी) झालेल्या अखिल भारतीय संपाला वर्ध्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपाला नैतिक पाठिंबा दर्शवत शाखेच्यावतीने रेल्वे स्थानक परिसरात निदर्शने करण्यात आली. कामगार एकतेचे नारे आणि घोषणांनी परिसर काही काळ दणाणून गेला.

या आंदोलनाचे नेतृत्व सहायक महामंत्री (मुख्यालय) एस. के. झा यांनी केले. शाखाध्यक्ष मुहम्मद जाहिद यांनी अध्यक्षस्थान भूषविले, तर शाखासचिव चंद्रेश्वर पांडेय यांनी संचालन केले. प्रास्ताविकात संपामागील भूमिका स्पष्ट करताना कामगारांच्या हक्कांवर गदा आणणारे निर्णय मागे घेण्याची मागणी करण्यात आली.रक्षित अश्वघोष, रोहित काटे, रविंद सिंह आणि राकेश कुमार यांनी आपल्या भाषणात कामगारांच्या एकजुटीची गरज अधोरेखित केली. श्रमिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन आणखी तीव्र केले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

निदर्शनात चंदन कुमार, अभिषेक थूल, गणेश कुमार, रोशन लांडगे, राहुल कुमार, प्रशांत गाडलिंग, ओंकार मिश्रा, अतुल पाटील, विजय मीनोटे, चेतन गवांडे, अविनाश मेंढे, प्रशांत मेंढे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## त्रिमूर्ती शिव जयंती महोत्सव साजरा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

देवळी,दि.१३

येथील ब्रह्माकुमारीज सेवा केंद्रात ९० वा त्रिमूर्ती शिव जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. महाशिवरात्रीनिमित्त परमात्मा शिव यांचा ध्वज मोहन अग्रवाल यांच्या हस्ते तसेच सेवा केंद्राच्या माधुरी दीदी यांच्या उपस्थितीत फडकवण्यात आला. अमरनाथ झांकी व शिवलिंग पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

मान्यवरांचे स्वागत सेवा केंद्र प्रभारी ब्रह्माकुमारी ममता दीदी व लीना दीदी यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मोहन अग्रवाल होते तर नगराध्यक्ष किरण ठाकरे तसेच उपनगराध्यक्ष राहुल चोपडा हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. भक्ति तिडके हिने स्वागत नृत्य सादर केले, तर ममता दीदी यांनी शब्दसुमनांनी मान्यवरांचे स्वागत केले.

माधुरी दीदी यांनी महाशिवरात्रीचे आध्यात्मिक रहस्य स्पष्ट करत परमपिता शिव परमात्म्यांचा संदेश दिला. परमात्मा शिव यांची सच्च्या अंतःकरणाने आठवण केल्यास जीवनातील विघ्ने दूर होतात, तसेच अंतर्मनातील विकारांची आहुती दिल्यास जीवन सुखमय होते, असे त्यांनी सांगितले. भगवानाच्या मतावर चालल्यास जीवनात सकारात्मक परिवर्तन घडते, असेही त्या म्हणाल्या. यावेळी सेवा केंद्रातर्फे नगराध्यक्ष किरण ठाकरे व उपनगराध्यक्ष राहुल चोपडा यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन मधु दीदी यांनी केले. माही, कावेरी चरडे व रिद्धी यांनी 'शिव महिमा' गीतावर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शंकर-पार्वती झांकीत सिद्धेश राऊत व माही यांनी भूमिका साकारली. आभार अविनाश राऊत यांनी मानले.

# विद्यार्थ्यांनी शाळेप्रती आत्मियता व सहकार्याची भावना ठेवावी : मोहिते

## काजळी येथील माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळा

कारंजा , दि.१३

■ महासागर प्रतिनिधी

माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील आत्ताच्या विद्यार्थ्यांना ज्या काही अडचणी आहेत त्यासाठी आपलं शाळेप्रती कर्तव्य म्हणून फुल,न, फुलाची पाकळी या शाळेसाठी विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी आर्थिक सहकार्य करण्याची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या मिळकतीमधून एक टक्का इतकी रक्कम शाळेच्या खात्यामध्ये जमा करून आताच्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे प्रतिपादन आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षक मोहन मोहिते यांनी केले.

काजळी येथील माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळा आयोजित करण्यात आला होता यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी एकमेकांची आस्थेने विचारपूस करीत जुन्या आठवणींना उजळा देण्यात आला.आजच्या धकाधकीच्या काळात संवाद कमी होत चालला आणि म्हणून आपसामध्ये दुरावा निर्माण होत आहे .याची जाणीव ठेवून मुख्याध्यापक रसिक डोंगर देव यांनी माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक रसिक डोंगरदेव यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक विद्यालय चिंचोली येथील आदर्श पुरस्कार प्राप्त माजी शिक्षक मोहन मोहिते, साहित्यिक इमरान राही, उल्हास बाघ. राष्ट्रीय कराटे प्रशिक्षक अंकुश गिरडे, शिक्षिका आशा उपासे, अमोल पेंढारकर, शिक्षक निकलेश भानसे, शिक्षिका पायल धारपुरे शिक्षिका चौधरी, गायनर गावातील प्रतिष्ठित नागरिक माजी विद्यार्थी निलेश रमदम, मनोज बागडे, रोशन धारपुरे, मिलिंद पठाडे , लीलाधर दिग्रसे ,रोशन वरठी , कांचन फरकाडे , आशु कोसे उपस्थित होते. मुख्याध्यापक डोंगरदेव आणि माजी विद्यार्थ्यांच्यावतीने शिक्षक मोहन मोहिते यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी जेष्ठ साहित्यिक इमरान राही ,माजी उपराष्ट्रपती धनकड यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. त्यांचा शाल श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. प्रदीर्घ कालावधीनंतर आयोजित स्नेहमिलन सोहळ्यात शिक्षक व विद्यार्थ्यांचा भेटण्याचा योग आला यामुळे सर्वच विद्यार्थ्यांमध्ये आनंद ओसंडून वाहत होता. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व जुन्या आठवणींना उजाळा दिला . कार्यक्रमानंतर सहभोजनाचा शिक्षक मोहिते, इमरान राही यांनी विद्यार्थ्यांसोबत आस्वाद घेतला.कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका आशा उपासे यांनी केले तर आभार शिक्षक अमोल पेंढारकर शिक्षक यांनी मानले.



### गुरु शिष्य परंपरा

शिक्षक मोहन मोहिते हे मुख्याध्यापक रसिक डोंगरदेव यांचे शिक्षक होते त्यांचेच शाळेत डोंगरदेव यांनी पाच ते दहावीपर्यंत शिक्षण घेतले. आणि आज रसिक डोंगरदेव हे माध्यमिक विद्यालय काजळीचे मुख्याध्यापक आहेत. हा प्रसंग गुरु शिष्य परंपरेची आठवण करून देणारा होता. मुख्याध्यापक डोंगरदेव बोलताना भावूक झाले होते.

# मुख्य बाजारपेठेत नाल्या तुंबल्या, घाणपाणी रस्त्यावर

## घनकचरा वाहून नेणारी गाडी अडवून नगरपंचायत प्रशासनाचा केला तीव्र निषेध

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

आष्टी (श),दि.१३

नगरपंचायतच्या ढिसाळ कारभारामुळे शहरवासीयांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नाल्या तुंबल्याने घाणपाणी सिमेंट रस्त्यावर वाहू लागले असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यामुळे संतापलेल्या नागरिकांनी आंदोलन छेडण्याची तयारी केली असून, दोन तास घंटागाडी अडवून प्रशासनाचा जाहीर निषेध नोंदवला.

२०१४ ला नगरपंचायत अमलात आली व पहिल्यांदाच काँग्रेसच्या हाती जनतेने नगरपंचायत दिली २०१४ ते २०१९ तत्कालीन आमदार अमर काळे यांना या नगरपंचायतचा कोणताही विकास करता आला नाही. पुन्हा २०२२ मध्ये झालेल्या नगरपंचायत निवडणुकीत अपक्ष उमेदवारांना हाती घेऊन पुन्हा सत्ता ताब्यात घेतली परंतु विकास कोसोदूर राहिला ज्या नेत्यांना विकास समजत नसेल त्यांनी कशाला न सत्ता हाती घ्यावी हा प्रश्न जनता विचारत



आहे २०१४ पासून आज बारा वर्ष आष्टी शहरात काँग्रेसची सत्ता असून आष्टी शहर हे वीस वर्षे विकासापासून मागे गेलेले आहे.

आष्टी तालुका हा शहीदवीरांचा तालुका असून, शहर हे हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. शांततेने प्रसिद्ध असलेल्या या शहरात सोनू भार्गव यांच्या घरासमोरच्या नाल्याने चोकअप होऊन घाणपाणी रस्त्यावर वाहू लागले. हा प्रकार गेल्या महिनाभरापासून सुरू आहे, तरी नगरपंचायतने अद्याप दखल घेतली नाही.मुख्य बाजारपेठेतील हा रस्ता गर्दीचा असल्याने आरोग्य धोका वाढला आहे.

### शहरात केवळ एक घंटागाडी आणि दोन मजूर

शहरात केवळ एक घंटागाडी आणि दोन मजूर घरोघरी कचरा गोळा करतात. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी सोनू भार्गव यांच्या शेजारी नागरिकांनी घंटागाडी अडवली आणि 'नाल्या उपसा करा' अशी मागणी केली.फोनवर मुख्याधिकारी व जबाबदार अधिकाऱ्यांना सूचित केल्यानंतरही कोणीही घटनास्थळी हजर झाले नाही. गेल्या दोन महिन्यांपासून नाल्या उपसल्या नसल्याने घाणीचे साम्राज्य पसरले असून, मच्छर-डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडून नगरपंचायत अधिकाऱ्यांना समज देऊन कार्यभार सुधारण्याची मागणी केली आहे.

## राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे धरणे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा,दि.१३

केंद्र व राज्य शासनाच्या कर्मचारी समगार विरोधी धोरणांचा निषेध व्यक्त करण्यासाठी तसेच दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागण्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सरकारी निमसरकारी कर्मचारी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती आणि राज्यसरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना यांच्या संयुक्त वतीने दि. १२ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वर्धा जिल्हा राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तथा समन्वय समितचे निमंत्रक दिपक धाबर्डे यांच्या नेतृत्वाखाली २ तास धरणे सत्याग्रह करण्यात आले.



आंदोलनात कृतिशील निवृत्त अधिकारी व कर्मचारी संघटना देखील धरणे सत्याग्रहात सहभागी झाले. देश व राज्यातील लाखो कर्मचारी शिक्षकांच्या न्याय्य मागण्या अद्याप प्रलंबित असुन त्यामध्ये चार कामगार संहिता रद्द करणे, पीएफआरडीए कायदा रद्द करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करणे, आठवा वेतन आयोग लागू करणे, रिक्त पदे भरणे, सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य विमा योजना लागु करणे, जुनी पेन्शन योजना लागु करणे, खाजगीकरण कंत्राटीकरणाला आळा घालणे, चतुर्थ श्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करणे, २००५ पुर्वीची सेवा पेन्शनसाठी ग्राह्य धरणे तसेच १०-२०-३० सेवातर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करणे या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले आहे.अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघातर्फे देशातील १० प्रमुख कामगार संघटना १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी लाक्षणीक संप केला आहे. आंदोलनात समन्वय समितीच्या निलीमा तातेकर, बी. के. बमनोटे, हरिश्चंद्र लोखंडे, अजय भोयर,नंदकिशोर बोबडे, सुरेशकुमार बरे, राखी जयस्वाल, मोहिन शेख, देवेंन्द्र थेटे, विलास भगत, पांडुरंग भालशंकर, दिपक धाबर्डे आदींनी मनोगत व्यक्त केले. यशस्वीतेकरीता प्रशांत भोयर, राजु लभाने, सचिन लाडेकर, संदीप ठाकरे, अमोल बुधबावरे, आनंद मुन, नरेन्द्र नागतोडे, अतुल चौधरी, प्रशांत भोसले, विनेश थोरात, बजरंग पवार, अमोल पोले, पुनम मडावी, अभय पवनारकर आदींनी परिश्रम घेतले. आंदोलन विनोद भालतडक यांनी तर उपस्थितांचे आभार चंद्रकांत मुटकुळे यांनी मानले.

